महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१

दूरध्वनी क्र. ०२२-२६५१०१३६ ईमेल- somsdesi@gmail.codm

क्रमांक : उविअ/मुंपउ/कार्या-५/भुजल/२०२६

बृहन्मुंबई महानगरपालिका
सहाय्यक आयुक्त
आर - मध्य विभाग

07 APR 2026

वेळ : स. १०.३० ते सं. ५.०० पर्यंत
स.आ./आर.मध्य./ 1073

प्रति,
किटक नियंत्रण अधिकारी,
आर/मध्य विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका

विषय : -आर/मध्य (बोरीवली) अनधिकृत भुजल वापरकर्त्यांविरूध्द करावयाच्या तात्काळ कारवाईबाबत.

संदर्भ :-१) आपलेकडील पत्र क्र. कीनका/आर-मध्य/९८३/एसआर दि. १७/०२/२०२६.
२) श्री. मुन्नालाल गजराज प्रजापती, बहुजन मुक्ती पार्टी, मुंबई प्रदेश उपाध्यक्ष यांचे पत्र दि. ०१/०४/२०२६.
३) या कार्यालयाचे पत्र क्र. उविअ/मुंपउ/कार्या-५/मुजल/२०२६ दि. ०१/०४/२०२६
४) मंडळ अधिकारी, बोरीवली यांचा व्हाट्सअॅपद्वारे प्राप्त अहवाल वा.क्र. २१७/मं.अ.बो/२०२६ दि. ०४/०४/२०२६.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी, आपले संदर्भिय पत्राद्वारे प्राप्त पत्राद्वारे ज्या ठिकाणी टँकद्वारे पाणी वाहतूक तसेच पाण्याचा व्यावसायिक वापर होत आहे, अशा बोअरवेलची यादी प्राप्त झाली होती. सदर प्रकरणांत व्यावसायिक पाणी उपसा करणाऱ्या व्यक्तींनी केंद्रीय भूजल प्राधिकरणाचे (CGWA) ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले आहे का, त्याअनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भिय क्र. ३ चे पत्रान्वये सदर विहिरी/बोअरवेल कोणाच्या मालकीच्या आहेत, याबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे तहसीलदार बोरीवली यांना निर्देश देण्यात आले होते.

त्याअनुषंगाने, मंडळ अधिकारी, बोरीवली यांनी सादर केलेल्या संदर्भिय अहवालानुसार, आर/मध्य विभागातील एकूण २७ कुपनिलिका/विहीर/बोअरवेल यांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. सदर तपासणीत असे निष्पन्न झाले आहे की, संबंधित ठिकाणी व्यावसायिक वापरासाठी कीटक नियंत्रण अधिकारी किंवा केंद्रीय भूजल प्राधिकरण (CGWA) यांचेकडील कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) प्राप्त केलेले नाही. सदर बाब अत्यंत गंभीर असून पर्यावरणाच्या दृष्टीने आणि नियमांचे उल्लंघन करणारी आहे.